देशोन्नती

# कथा, कवितांच्या माध्यमातून वैविध्यपूर्ण जीवन अनुभवाचे सादरीकरण

## परभणीत साहित्य मंच कार्यक्रमास प्रतिसाद

मानवी जीवनातील नातेसंबंधांवर भाष्य करणाऱ्या कथा आणि रंगतदार कवितांच्या माध्यमातून येथे 'साहित्य मंच' हा कार्यक्रम पार पडला. कथा व कविता वाचनांच्या माध्यमातून लेखक, कवींनी आपले वैविध्यपूर्ण जीवनअनुभव यावेळी विशद केले. साहित्य अकादमी व श्री. शिवाजी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम घेण्यात आला.

देशोन्नती वृत्तसंकलन

येथील श्री. शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात शनिवार १५ मार्च रोजी साहित्य अकादमी व श्री शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्य मंच हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात बा.बा. कोटंबे, मिलिंद जाधव यांनी कथा वाचन केले तर मोहन कुलकर्णी, केशव खटींग, संतोष नारायणकर यांनी कविता वाचन केले.

या कार्यक्रमाला शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.यु. जाधव, डॉ. आसाराम लोमटे यांची उपस्थिती होती. लोमटे यांनी प्रास्ताविकात 'साहित्य मंच' या उपक्रमामागील हेतू विशद केला. प्रारंभी कोटंबे यांनी 'पडझड' या कथेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कुटुंब व्यवस्थेतील पेच सांगितला. बदलत्या काळाचा परिणाम कुटुंबातल्या नात्यावर कसा होतो हे या कथेतून त्यांनी सांगितले तर मिलींद जाधव यांनी 'खुलासा' या कथेतून एका मध्यमवर्गीय कुटुंबातल्या नात्यावर प्रकाश टाकला. मोहन कुलकर्णी यांनी 'बंद खिडकीच्या आत', 'पाऊस, काही टिपण', 'देह सजवायचा' या कविता सादर केल्या. सताड उघड्या खिडकीच्या गजातून तिनं आभाळ ठिबकताना पाहिलं, आणि स्वतःच्याच पापण ओल्या डोळ्यातून ती मोर नाचवत राहिली, या त्यांच्या ओळींना उपस्थितांनी दाद दिली.' कवी केशव खटींग यांनी 'मॉडगेज',

## साहित्य अकादमीचा उपक्रम

'दिस कडूशार झाले', 'लेक म्हणजे कवितेचे प्रत्यक्ष रूप' या कविता सादर केल्या. त्यांच्या दोन्ही कवितांना उपस्थितांनी भरभरून दाद दिली. कवी संतोष नारायणकर यांनी 'देव परिक्षा घेतात', 'कपड्यांचा संदुक', 'दोन पाय, दोन हात' या कविता सादर केल्या. या कार्यक्रमाचे संचलन प्रा. बडुरे यांनी केले तर आभार प्रा. प्रल्हाद भोपे यांनी मानले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ कवी केशव बा. वसेकर, रेणू पाचपोर, सरोज देशपांडे, तुकाराम खिल्लारे, राजेंद्र गहाळ, प्रा. भगवान काळे, गंगाधर गायकवाड, माणिक पुरी, प्रा. जयंत बोबडे, प्रा. सखाराम कदम, सुरेश हिवाळे, शरद ठाकर, बालासाहेब जाधव, दत्ता चव्हाण, त्र्यंबक वडसकर, अरुण चव्हाळ, प्रा. प्रविण पुरी, प्रा. मयुरी शिंदे, प्रा. सारिका पासगे, प्रा. स्वाती देशमुख, मारोती डोईफोडे, माणिक रासवे सुरेश पेदापल्ली आदींसह रसिक उपस्थित होते.